REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख १९ मे, १९४८ | अंक १९

## पूना कमर्शिअल हायस्कूल

**सरकारमान्य एस. एल. सी. परीक्षेचा अभ्यासक्रम.**

शॉर्टहॅड, टाइपरायटिंग, बुक-कीपिंग असे व्यावहारिक व उपयुक्त विषय. इं. ४ थींत, ५ वींत व व्ह. फा. पास विद्यार्थ्यांसाठीं स्पेशल क्लासांत प्रवेश. नांवनोंदणी चालू.

**मुख्याध्यापक,**
५९४ बुधवार पेठ, जिजामाता बागेजवळ, पुणें.

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

**हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.**

★ **नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. बिमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.**

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

**शं. न. आगाशे**
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि रत्नाकर बँक, लि.

**स्थापना : १९४३**

**—: शाखा :—**

**(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| आधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

*—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—*

**नामदार बी. बी. पाटील.**
B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.
**चेअरमन**

**श्री. गं. सि. चौगुले.**
M. L. A. कोल्हापूर
**व्हा. चेअरमन**

**एल. एन्. शहा.**
B. Com., C. A. I. I. B.
**मॅनेजर**

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें









वर्कशॉप मशिनरी (२)

हेवी ड्यूटी

**शिमोगा लेथ**

(८′—१०″)

संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला

— चौकशी स्थान —

केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**हिंदुस्थानांत शेक तंत्रज्ञ**— हिंदुस्थानांतील औद्योगिक परिस्थिति पहाण्यासाठी व हिंदी उद्योगपतींशी विचारविनिमय करण्यासाठी शेक तज्ज्ञांचें एक मंडळ हिंदुस्थानांत येण्यास निघालें आहे.

**रशियाचें नवें तेलाचें केंद्र**—कुइबिशेव्ह ह्या उरल पर्वताच्या जवळील शहराच्या भागांत तेलाच्या सांठ्याचा नव्यानें शोध लागला आहे. १९४१ सालीं युद्धांत मॉस्कोला धोका उत्पन्न झाला होता त्यावेळीं रशियन सरकार ह्याच शहरांत स्थानापन्न झालें होतें.

**सहकारी बँकांना मदत**—पदार्थांच्या किंमतींत झालेल्या वाढीमुळें ज्या शेतकऱ्यांना तंगी जाणवत आहे, त्यांना मदत करण्यासाठी म्हणून ग्वाल्हेरच्या सरकारनें सहकारी बँकांना २ लाख रुपये मंजूर केले आहेत.

**दि बेलापूर कं. लि.**—वरील कंपनी आपल्या रिझर्व्ह फंडाच्या ९,३९,९५० रुपयांचे भाग आपल्या भागदारांस भागांचे स्वरूपांत देणार आहे. म्हणजे, रिझर्व्ह फंडाची रकम कमी होऊन त्या प्रमाणांत शेअर भांडवल वाढेल.

**चिनी व अमेरिकन डॉलर**—चिनी डॉलर व अमेरिकन डॉलर ह्यांच्या किंमतींचें अधिकृत प्रमाण ३,२४,०००:१ असें असलें तरी बाजारांतील वस्तुस्थितीप्रमाणें तें ११,२०,०००:१ असेंच आहे.

**अमेरिकेची तेलाची भूक**—अमेरिकेची तेलाची आयात आतां निर्गतीपेक्षा जास्त होऊं लागली आहे. तेलाचा तेथील खप एका वर्षांत ६.४% नें वाढला आहे.

**उसाच्या लागवडींत वाढ**—हिंदुस्थानांतील उसाच्या लागवडींत १०% वाढ झाली आहे, असा सरकारी अंदाज आहे. गेल्या वर्षी ३२ लक्ष, ५९ हजार एकरांत ऊस होतो. तो आतां ३५ लक्ष, ८३ हजार एकरांत आहे.

**हैद्राबाद स्टेट बँकेचें राष्ट्रीयीकरण**—हैद्राबाद स्टेट बँक ही भागीदारांची बँक असून ती इकडील इंपीरिअल बँकेप्रमाणें व्यवहार करीत असते. चलनी नोटा काढण्याचें काम तिचेकडे नाहीं. ५१% भाग हैद्राबाद सरकारच्या मालकीचे असून ४९% भाग इतरांनीं घेतलेले आहेत. निजाम सरकारच्या खऱ्या खुऱ्या मध्यवर्ती बँकेचा दर्जा तिला देण्याचे हेतूनें आतां कायदा करण्यांत येत आहे. तिची घटना कॉमनवेल्थ बँक ऑफ ऑस्ट्रेलिया ॲक्टाचे धर्तीवर केली जात आहे. प्रत्येक भागास १४३ रु. ह्या दरानें भागीदारांस पैसे दिले जातील.

**काळ्या बाजारासाठीं रेडिओचा उपयोग**—सुमारें ४०० ध्वनिक्षेपक यंत्रांतून जर्मनीमध्यें काळ्या बाजारांतील व्यापाऱ्यांच्या टोळ्यांस ताज्या बातम्या पुरवल्या जातात, अशी बातमी आहे. काळ्या बाजारांतील ठिकठिकाणचे बाजारभाव, मागणी, पुरवठा, इत्यादींची माहिती त्यांतून सांगितली जाते.

**आगबोटींच्या वहातुकींत हिंदुस्थानास वाढता वांटा**—परराष्ट्रीय व्यापार वहातुकींत हिंदी मालकीच्या आगबोटींस अधिकाधिक वाव मिळावा, ह्यासाठी हिंदुस्थान सरकार तीन मोठ्या कॉर्पोरेशन्स स्थापन करणार आहे. कंपनी कायदा त्यांस लागू होईल व सरकार ५१% भाग धारण करील. विद्यमान कंपन्यांशीं ह्या बाबत वाटाघाटी चालू आहेत.

**मुंबई प्रांतांतील कामगार संघ**—मुंबई प्रांतांत १ डिसेंबर, १९४७ रोजीं ५३० कामगार संघ होते आणि त्यांच्या सभासदांची संख्या ४,६८,०७८ होती. १ जून, १९४७ रोजीं ४,२५,५२८ सभासदांचे मिळून ४५७ संघ अस्तित्वांत होते. म्हणजे, सहा महिन्यांत सभासदांची संख्या १०% नें वाढली.

**गव्हाची निर्गत करणारे प्रमुख देश**—गेल्या वर्षी गव्हाची जेवढी निर्गत झाली, तिचा ९७% हिस्सा अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया ह्यांनीं पाठविला. एकूण निर्गतीच्या ५६% हिस्सा अमेरिकेचा आहे.

**अमेरिकन नागरिकांनीं परदेशी पाठविलेल्या देणग्या**—१९४७ सालीं अमेरिकन लोकांनीं परदेशांतील नागरिकांना ४७.७ कोटी डॉलर्सच्या देणग्या पाठविल्या. त्यापैकीं ४६ टक्के देणग्या अन्न व वस्त्र ह्या स्वरुपांत व इतर पैशाच्या स्वरुपांत होत्या. धार्मिक, शैक्षणिक आणि धर्मादाय संस्थांनीं ११.३ कोटींच्या देणग्या मुख्यतः युरोपला पाठविल्या. त्यापैकीं ३९ टक्के अन्नाच्या व ४९ टक्के कापडाच्या होत्या. युद्धोत्तर काळापैकीं १९४६ व १९४७ सालीं अमेरिकेकडून ६ अब्ज, ३० कोटी डॉलर्सच्या देणग्या परदेशीं पाठविल्या गेल्या. त्यापैकीं १ अब्ज, ६० कोटी डॉलर्सच्या खाजगीरीत्या व उरलेल्या अमेरिकन सरकारनें दिल्या.

**संयुक्त प्रांतांत शिधानियंत्रण उठलें**— ता. १५ मे, १९४८ पासून संयुक्त प्रांत सरकारनें शिधानियंत्रण रद्द केलें आहे. त्याचबरोबर आयात झालेल्या अन्नधान्यापैकीं ६० हजार टनांचा सांठा करण्याचेही सरकारनें ठरविलें आहे.

**फॅक्टरी कायद्याची कक्षा**—मुंबई सरकारनें फॅक्टरी कायद्याची कलमें, कापड व सूत रंगविण्याचे, सफेत करण्याचे कारखाने व रबरी फुग्याचे कारखाने ह्यांना लागू केलीं आहेत. ह्या कारखान्यांतून दहापेक्षां अधिक कामगार असतील तरच त्यांना वरील कलमें लागूं होणार आहेत. कायद्याच्या कलमांचें उल्लंघन करणारास शिक्षा ठेवण्यांत आली आहे.

**संस्थानी हद्दींतून साऱ्याची सूट**—१५ ऑगस्ट, १९४७ चा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी म्हणून मुंबई सरकारनें प्रांतांत जमीन महसुलांत १० टके सूट जाहिर केली होती. त्यानंतर बरीच संस्थानें मुंबई प्रांतांत सामील झालीं आहेत. ह्या संस्थानांतील जनतेलाही आतां वरील सूट देण्यांत येणार आहे. सुटीच्या रकमा शेतकऱ्याला अगर कुळाला देण्यांत येतील अथवा स्थानिक स्वरूपाच्या सुधारणा करण्यासाठीं खर्च करण्यांत येतील.

**लग्नावरील खर्चांवर नियंत्रण**—पाकिस्तानच्या विधिमंडळांत मुसलमानांच्या लग्नांतील खर्चावर नियंत्रण घालणारे एक बिल एका सभासदानें प्रविष्ट केलें आहे. लग्नांत होणाऱ्या भरमसाठ खर्चामुळें कित्येक कुटुंबांना लग्न निघणें ही एक आपत्ती वाटूं लागली असल्याचें बिलाच्या उद्देशपत्रिकेंत व्यक्त करण्यांत आलें आहे.

**गुजराथी भाषेचा शब्दकोश**—सौराष्ट्र सरकारनें श्री. चुनीलाल पटेल ह्यांना गुजराथी भाषेचा शब्दकोश पुरा करण्याचें काम सांगितलें आहे. ह्या कोशाला प्रारंभ गोंडळच्या महाराजांच्या प्रोत्साहनानें झाला. श्री. पटेल हे गोंडळ संस्थानांत पूर्वी शिक्षणमंत्री होते. शब्दकोशांत २ लाखांवर शब्द देण्यांत येतील.

# अर्थ

बुधवार, ता. १९ मे १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## पॅलेस्टाइनचा बळी

पॅलेस्टाइनचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघास समाधानकारकपणें सोडवितां आला नाहीं आणि अखेर ग्रेट ब्रिटननें पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें १४ तारखेच्या मध्यरात्रीं तेथून आपला पाय काढून घेतला. ब्रिटिश राज्यकर्त्यांची जागा घेण्याची कोणतीच योजना करण्यांत आली नाहीं. ब्रिटिश राज्यकर्ते तेथें असतांनाच अरब व ज्यू ह्यांचेमध्यें तुरळक लढाया सुरू होत्या, त्या आतां उघडपणें मोठ्या प्रमाणावर चालू झाल्या आहेत. जागतिक युद्धाचा पाया तेथें बसणार कीं काय अशी भीति निर्माण झाली आहे. पहिल्या महायुद्धानंतरचा पॅलेस्टाइनचा इतिहास सर्वांच्या परिचयाचा आहे. राष्ट्रसंघाच्या योजनेप्रमाणें ग्रेट ब्रिटननें पॅलेस्टाइन मँडेटचा कारभार पत्करला. जुन्या राष्ट्रसंघाची जागा आतां नव्या संयुक्त राष्ट्रसंघानें घेतली, तिला ग्रेट ब्रिटननें नोटीस देऊन आपण आपली तेथील सत्ता काढून घेणार असें कळविलें. त्यानंतरची पॅलेस्टाइनची फाळणीची योजना, योजनेस असलेला अमेरिकेचा पाठिंबा काढून घेतल्याची १९ मार्चची अचानक घोषणा, विश्वस्तपणा पत्करण्यास नकार, इत्यादि घटना अगदी ताज्या आहेत. पॅलेस्टाइनच्या फाळणीचा निर्णय घेऊन नंतर त्याचा आपला पाठिंबा काढून घेण्यांत अमेरिकेनें फार चलबिचल दाखविली आहे आणि रशियाच्या भितीचें दडपण त्यामुळें स्पष्ट झालें आहे. फाळणी पार पाडण्यासाठीं पॅलेस्टाइनमध्यें आंतरराष्ट्रीय सैन्य ठेवावें लागणार आणि त्या सैन्यांत रशियाच्या सैन्याचा अवश्यमेव समावेश होणार; त्यामुळें रशियाचें मध्यपूर्वेंत वजन वाढणार; ह्या सर्व गोष्टी अमेरिकेस अप्रिय अशा आहेत.

सुमारें ३,००० वर्षांपूर्वी ( म्हणजे खिस्तापूर्वी १,००० वर्षें ) ज्यूंनीं पॅलेस्टाइन जिंकलें आणि रोमन लोकांनीं तर ज्यूंची सन १३५ सालीं तेथून पुरी हकालपट्टी केली. तेव्हांपासून १८०० वर्षें जेरुसलेम प्रदेश " अरबी " राहिला आहे. पहिल्या महायुद्धाचे वेळीं, पॅलेस्टाइन हा तुर्की साम्राज्यांत असतांना, ज्यू व अरब ह्या दोघांनाहि उलटसुलट आश्वासनें देण्यांत आली. विशेषत: १९१७ मध्यें ब्रिटनतर्फे लॉर्ड बाल्फर ह्यांनीं ज्यू लोकांना दिलेलें वचन सुप्रसिद्ध आहे. पॅलेस्टाइनमध्यें ज्यू राष्ट्र निर्माण करण्यास मदत करण्याचा ग्रेट ब्रिटनचा निर्धार त्यांत स्पष्ट होता. ब्रिटिशांनीं पॅलेस्टाइनमधील अल्पसंख्याक ज्यूंना दिलेलें हें भरमसाट अभिवचन त्यास पाळतां आलें नाहीं, परंतु त्यामुळें ज्यू-अरब तेढ मात्र वाढत गेली आणि युरोपियन राष्ट्रांनाहि ज्यू लोक स्वत:चे प्रदेशांत नको असल्याकारणानें त्यांनीं ज्यूंच्या स्वतंत्र राष्ट्रास पाठिंबा दिला. अरबी प्रदेशांतील ह्या हस्तक्षेपानें आतां उग्र स्वरूप धारण केलें आहे.

पॅलेस्टाइनच्या फाळणीस रशियानें संमति दिली, ह्या घटनेचा अर्थ अमेरिका प्रभृति राष्ट्रांच्या लक्षांत येण्यास थोडा वेळ लागला असें दिसतें. नाहींतर त्यांनीं फाळणीच्या अंमलबजावणीचे कामीं पुढाकार घेऊन नंतर माघार घेण्याचा प्रसंग ओढवून घेतला नसता. इराणच्या आखातांत रशियाला प्रवेश हवा आहे. ज्यू राष्ट्र निर्माण करण्यासाठीं पॅलेस्टाइनची फाळणी, तर अर्मेनिअन राष्ट्रासाठीं तुर्कस्तानची फाळणी का नको ? आणि आझरबैजान राष्ट्राच्या निर्मितीसाठीं इराणची फाळणी का नको ? ह्याच चालीवर जाऊं लागल्यावर रशियाचें वर्चस्व वाढण्यास किती वेळ लागणार ? मध्यपूर्वेंतील तेलावर रशियास प्रभावी सत्ता मिळाली म्हणजे पश्चिम युरोपास तेलाचा पुरवठा कोठून होणार ? मार्शल योजनेचा त्यामुळें एक मोठा आधारच नष्ट होण्याजोगा आहे. म्हणजे पश्चिम युरोपाची रशिया-विरोधी संघटनाहि कमकुवत होणार आहे.

पॅलेस्टाइन प्रकरणीं ग्रेटब्रिटननें व आतां अमेरिकेनें आखलेलें धोरण ज्यू लोकांच्या अंतिम हिताचें कितपत होणार आहे, हें लवकर कळून येईल. ज्यू लोकांचें इस्राएल हें नवें राष्ट्र ता. १४ रोजीं प्रस्थापित झालें, त्यास अमेरिकेनें मान्यता दिली आहे. बहुंशीं अरबी प्रदेशांत एकेकाळीं अगदी अल्पसंख्यांक असणाऱ्या ज्यूंची लोकसंख्या पॅलेस्टाइनमध्यें गेल्या कित्येक वर्षांत ब्रिटिश व अमेरिकन स्वार्थप्रेरित ज्यू-विषयक सहानुभूतीच्या धोरणामुळें वाढत गेली आहे आणि आतां तर ज्यू राष्ट्र निर्माण होऊन त्याच्या प्रीत्यर्थ रक्तपातास उघडपणें संमति देण्यांत आली आहे. पॅलेस्टाइनचा प्रश्न ज्या पद्धतीनें हाताळण्यांत आला, त्यानें संयुक्त राष्ट्रसंघ व त्याचीं प्रमुख घटक राष्ट्रें ह्यांच्या उद्देशांच्या शुद्धतेबद्दल चांगलीच साशंकता निर्माण केली आहे. ज्यू व अरब ह्यांचेमधील वांधा युद्धद्वारा सत्वर आपोआप मिटेल, असेंहि म्हणतां येणार नाहीं. कारण, प्रमुख राष्ट्रें त्या युद्धांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें कसा भाग घेतील ह्यावर पुष्कळसें अवलंबून आहे. अरबांचा पॅलेस्टाइनवरील शेकडों वर्षांचा हक्क आणि त्यांचेवर बाहेरून लादलेल्या ज्यूंचे हितसंबंध ह्यांचेमधील वितुष्टाचें पर्यवसान अखेर तिसऱ्या महायुद्धांत न होवो म्हणजे झालें.

## कापडाच्या महागाईची चौकशी

हिंदी पार्लमेंटचे एक सभासद श्री. अनंतशयनम् अय्यंगार ह्यांची टॅरिफ बोर्डापुढें कापडाच्या महागाईसंबंधीं साक्ष झाली. कापडावरील नियंत्रण रद्द केल्यापासून गिरणी मालकांनीं नफा उकळण्याची निर्लज्ज कमाल केली असें ते म्हणाले. गिरणींतून कापड बाहेर गेल्यावर तें गिऱ्हाइकापर्यंत पोंचेपर्यंत त्याच्या किंमतीमध्यें १० ते १२ टक्क्यांपेक्षां अधिक वाढ होता कामा नये. त्याचप्रमाणें ह्यापुढील कापडासंबंधींचें धोरण गिरणी-मालकांनीं न ठरवतां नि:पक्षपाती तज्ज्ञांनीं ठरवावें, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. एप्रिलमध्यें कापडावरील नियंत्रण घाईनें काढून टाकल्याबद्दल आणि किंमतीचा प्रश्न टॅरिफ बोर्डाकडे सोंपविल्यावर किंमती छापण्याचें बंद केल्याबद्दलही त्यांनीं सरकारशीं मतभेद दर्शविला. गिरणीच्या धंद्यांतील नफ्याचा वाटा भांडवलदार व मजूर ह्यांच्याप्रमाणेंच किंमती उतरण्याच्या रूपानें ग्राहकांनाहीं मिळाला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें.

## ब्रिटनची आर्थिक परिस्थिति व मार्शल योजनेचें यश

( भा. म. का. )

महायुद्धानंतरच्या काळांत पुनर्घटनेच्या कार्यक्रमांतील अडचणी, सरकारनें बसविलेलीं नियंत्रणें, मजूर वर्गाकडून कामाच्या कमी तासाची मागणी व तिची अंमलबजावणी इ. गोष्टी असूनहि ब्रिटनचें उत्पादन हमखास वाढत आहे, व ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीची मदार स्वयंपूर्णतेपेक्षां वाढत्या उत्पादनावर आहे हें लक्षांत घेतां, साधारणपणें ब्रिटनची आर्थिक परिस्थिति हळू हळू पण निश्चितपणें सुधारत आहे असें अनुमान निघतें. युरोपांतील व आशिया खंडांतील रशियाच्या वाढत्या राजकीय वर्चस्वामुळें अमेरिकेची ब्रिटनबद्दल, कांहीं दिवसापूर्वी घसरगुंडीस लागलेली सहानुभूति आतां पुन्हा वाढत चालली आहे असें म्हणावयास बराच पुरावा आहे. मार्शल योजना अंमलांत आल्यास त्या योजनेमुळें ब्रिटनलाहि अमेरिकन कर्ज मिळावयाचें आहे. १९४७ सालीं पूर्वीच्या वर्षाच्या मानानें ब्रिटनचें उत्पादन ९ टक्यांनीं वाढलें, आणि चालू वर्षी तें आणखी जास्त प्रमाणांत वाढणार आहे असा अंदाज आहे. ब्रिटनची निर्यातहि वाढत आहे, परंतु त्या मानानें आयात मात्र घटत आहे. वाढती निर्यात व कमी होणारी आयात ह्याचा एक अर्थ असा निघूं शकतो कीं आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं ब्रिटिश लोकांना स्वतःच्या आवश्यक गरजांना कांहीं प्रमाणांत कात्री लावावी लागत आहे, व अशी कात्री किंबहुना वाजवीपेक्षां जास्त लावून ब्रिटिश लोक एक प्रकारें जादा विक्री–माल जगांतील गरजू राष्ट्रांना पुरवून त्यांना जणू कांहीं उपकृत करून ठेवीत आहेत, अशी एक विचारसरणी ब्रिटनतर्फे मांडली जात आहे, व त्या विचारसरणींतून असाहि अर्थ ध्वनित केला जातो कीं हिंदुस्थान, इजिप्त, अर्जेंटिना, ब्राझील, इराक, इ. देशांशीं ब्रिटननें केलेल्या स्टर्लिंग कर्जाच्या अल्प प्रमाणांत परत फेडीच्या योजना वाजवीपेक्षां जास्त उदार स्वरूपाच्या आहेत व त्यामुळें स्वतःच्या गरजा कांहीं प्रमाणांत कमी करून ब्रिटनला वाजवीपेक्षां जास्त निर्यात करावी लागत आहे. तेव्हां यापुढें स्टर्लिंग कर्ज परत फेडण्याच्या वाटाघाटी करतांना तें कर्ज शक्य तितकें कमी तरी करावें; किंवा कर्ज–परत–फेडीचा हप्ता लहानांतला लहान असा ठरविला जावा. ब्रिटनची आर्थिक परिस्थिति सुधारत असतांना, विचाराचे वारे कोणत्या दिशेनें वहात आहेत याची कांहींशी जाणीव ह्या विचारसरणीवरून लक्षांत येण्यासारखी आहे. ब्रिटन वाजवीपेक्षां जास्त उदार आहे, त्यामुळें ब्रिटनचें स्वतःचें संकट वाढत आहे, तेव्हां अमेरिकेनें मदत मुक्त हस्तानें करावी व ब्रिटननेंहि आपल्या उदार स्टर्लिंग–कर्ज परत फेडीच्या धोरणाला आळा घालावा असा ब्रिटिश विचारसरणीचा आशय आहे.

मार्शल योजनेप्रमाणें मदत मिळूं लागल्यावर व्यापारी देवघेवीच्या बाबतींत ब्रिटनची परिस्थिति जास्त आशाजनक होणार आहे. १९४८ च्या नवीन योजनेप्रमाणें निर्गतीचा आकडा थोडा कमी करून तो १९३८ च्या निर्गतीच्या १६० टक्के करण्यांत येणार आहे. अशा प्रकारें तो सुमारें १५ टक्के कमी करण्यांत आला तरीहि ब्रिटनच्या उत्पादनशक्तीवर ताणच पडल्याशिवाय राहाणार नाहीं असें मत आहे; कारण उत्पादनाच्या साधनांचीं म्हणजे यंत्र सामुग्री इ. ची तीं जुनी झाल्यामुळें कार्यक्षमता घटली आहे, वहातुकीचीं साधनें तर विशेषच जीर्ण झालीं आहेत, औद्योगिक शांतता निश्चितपणें राहिल कीं नाहीं तें कॉम्युनिस्टांच्या धोरणावर अवलंबून राहाणार आहे व कच्च्या मालाचा पुरवठा ब्रिटनला भरपूर करतां आला नाहीं किंवा निर्गतीच्या काटामुळें कच्चा माल कमी प्रमाणांत खरेदी करावा लागला तरीहि ब्रिटनची व्यापारी जगांतील कार्यक्षमता थोडीशी घटेल. त्या सर्व परिस्थितीला ब्रिटनला तोंड द्यावयाचें आहे. ही परिस्थिति बरीचशी जागतिक स्वरूपाची आहे हें थोड्या विचाराअंतीं लक्षांत येईल.

ब्रिटनची अर्थ-व्यवस्था निर्गत व्यापारावर व म्हणून उत्पादनाच्या परिस्थितीवर व कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्याची जागतिक बाजारपेठेंतील परिस्थिति आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, कॅनडा, हिंदुस्थान इ. देशांतून थोड्या प्रमाणांत सुधारत आहे. परंतु ह्या सर्व देशांतून माल खरेदी करण्याची मदार स्टर्लिंग व डॉलर गटांतील परस्पर परिस्थितीवर अवलंबून आहे. हुंडणावळीच्या बाबतींत आंतरराष्ट्रीय चलन निधीनें ठरवून दिलेले नियम सर्वच घटक राष्ट्रें पूर्णपणें मानतीलच असें अगदीं अलिकडेच फ्रान्स व इटली ह्या देशांच्या धोरणावरून दिसून येत नाहीं. आणखी एक निश्चयात्मक बाब म्हणजे डॉलरचें वर्चस्व. अमेरिकन कर्ज योजनेमुळें किंवा मार्शल प्लॅनमुळें जगांतील मदत स्वीकारणाऱ्या युरोपियन राष्ट्रांवर डॉलरचें वर्चस्व वाढत जाईल. म्हणजेच अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या आहारीं पश्चिम युरोपला जावें लागेल. ही परिस्थिति अंतर्गत उत्पादन अपेक्षेप्रमाणें योग्य कालमर्यादेंत सुधारल्यास, व जगांतील निरनिराळे देश पश्चिम युरोपियन राष्ट्रांचा माल खरेदी करावयास समर्थ झाल्यास सुधारूं शकेल. म्हणजेच असा संभव दिसतो कीं मार्शल योजनेमुळें मिळणाऱ्या परिस्थितीचा भरपूर फायदा ब्रिटन इ. देशांना घ्यावयाचा असल्यास, व्यापारी संबंध येणाऱ्या सर्वच देशांची अंतर्गत परिस्थिति उत्पादनाच्या दृष्टीनें कच्चा माल पुरविण्याच्या दृष्टीनें, पक्का माल विकत घेण्याच्या दृष्टीनें व थोडक्यांत म्हणजे राहाणीचें मान सुधारण्याच्या दृष्टीनें निश्चित प्रमाणांत वाढीस लागणें आवश्यक आहे. असें होईल तरच मार्शल योजना यशस्वी होईल.

सारांश, केवळ मार्शल योजनेमुळेंच खुद्द ब्रिटनचा किंवा पश्चिम युरोपियन राष्ट्रांचा प्रश्न सुटणारा नाहीं. व्यापारी व आर्थिक संबंध येणाऱ्या सर्वच देशांची परिस्थिति हळु हळु सुधारली पाहिजे, तरच रशियाची भीति कमी होईल, व आर्थिक स्वास्थ्य नांदण्याच्या दृष्टीनें अमेरिकेचे प्रयत्न यशस्वी होतील.

---

**एंजिनें बनविण्याचा कारखाना**—मुंबई येथील एका कंपनीला मध्यवर्ती सरकारच्या भांडवल-नियंत्रण अधिकाऱ्यानें डीझेल एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठीं ७५ लाख रुपये भांडवल उभारण्याची परवानगी दिली आहे. एंजिनें तयार करण्याची कारखान्याची योजना दूरगामी स्वरूपाची आहे. ह्या शिवाय कोल्ड स्टोअरेज युनिटच्या एका कारखान्यालाही १२½ लाख रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मिळाली आहे. एंजिनें तयार करणाऱ्या कंपनीचें नांव महींद्र एंजिनिअरिंग कं. लि. असें आहे.

**गुरांची पैदास करणारांची परिषद्**—गुजराथ, काठेवाड, कच्छ, राजपुताना व मारवाड ह्या भागांतील गुरांची पैदास करणाऱ्या लोकांची एक परिषद ता. २४ व २५ मे रोजीं बडोदा संस्थानांतील विसनगर ह्या गांवीं भरणार आहे.

**तिकिट न घेतां प्रवास**—ईस्ट इंडिआ रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं विनातिकिट प्रवास करणाऱ्या ५,५३९ लोकांना मार्च महिन्यांत पकडले व त्यांच्यावर खटले भरले. खटल्यांतून झालेल्या दंडाच्या रकमांचें उत्पन्न १ लाख, १८ हजारावर भरलें. आकार न देतां सामान नेणारे २,४२७ लोकही ह्याच महिन्यांत सांपडले.

## विमा कंपन्यांच्या बोर्डावर विमेदारांचे प्रतिनिधी

### निवडणुकीचे बाबतींत अनास्था

विमेदारांना विमा कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार दिला तरी त्याचा नीट उपयोग करून घेण्याचे बाबतींत अत्यंत अनास्था दिसून येते. ३० सप्टेंबर १९४६ नंतरचे ह्या संबंधांतील आकडे पाहिले, तर ४६ निवडणुकींपैकी ३४ निवडणुकींमध्यें जागांइतकेच उमेदवार होते आणि ६ मध्येंतर जागाइतकेहि उमेदवार पुढें आले नाहींत. उरलेल्या सहा निवडणुकींपैकी दोहोंमध्यें एकूण विमेदारांपैकी फक्त १% विमेदारांनींच मताचा हक्क उपयोगांत आणला; बाकीच्या चारांत तें प्रमाण अनुक्रमें ३%, ५%, ६% व ९% पडलें. भागीदारांनीं निवडून दिलेले डायरेक्टर विमा कंपन्यांचा कारभार पहात असले, तरी विमेदारांचे हितसंबंध हे अधिक महत्त्वाचे असतात; तथापि त्यांना डायरेक्टर निवडून देण्याचा अधिकार मिळाला असला तरी त्याचा उपयोग करण्यांत मात्र त्यांची अनास्था दिसून येते. फारच थोडे उमेदवार पुढें येतात आणि फारच थोडे विमेदार मतदानाचा हक्क बजावतात. कंपन्यांचे चालक हेच स्वतः आपल्या तर्फेचे उमेदवार विमेदारांतर्फे निवडून आणूं शकतात आणि विमेदार हे सर्वत्र पसरलेले व असंघटित असतात. अशा रीतीनें विमेदारांचें प्रतिनिधित्व ही एक निष्कारण खर्चाची व निरुपयोगी बाब होऊन बसली आहे.

### विमा कंपन्यांविरुद्ध विमेदारांच्या तक्रारी

सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे कंपन्यांचे विरुद्ध विमेदारांच्या कित्येक तक्रारी जात असतात. त्याबद्दल सुपरिंटेंडेंट हे त्या त्या कंपन्यांकडे पत्रें पाठवून खुलासा विचारतात. साधारणपणें बहुतेक कंपन्या योग्य तीं उत्तरें धाडतात., परंतु कांहीं कंपन्या (मोठ्या व जुन्या देखील) साधी पोंचहि पाठविण्याचा चांगुलपणा दाखवीत नाहींत! अशा तऱ्हेची वृत्ती हिंदी विमा व्यवसायास घातुक आहे, हें सांगण्याची गरज नाहीं. विमा कंपन्या श्रीमंत व त्या मानानें विमेदार हा गरीब असतो हें लक्षांत घेऊन, कंपन्यांनीं विमेदारांची सोय अगत्यपूर्वक पहाणें जरूर आहे. सुपरिंटेंडेंटकडे येणाऱ्या तक्रारींत क्लेमपूर्तीच्यासंबंधीं तक्रारींचाच भरणा मोठा असतो. क्लेमचा खरे-खोटेपणा तपासणें आवश्यक असलें तरी त्या बाबत कंपन्यांनीं निष्कारण विलंब लावणें श्रेयस्कर नाहीं. विमा कायद्याच्या ११३ व्या कलमानें विमेदारांस सरेंडर व्हॅल्यू व पेड अप पॉलिसी ह्यांबाबत अधिकार दिलेले आहेत, ते विमेदारांच्या हातीं कंपन्या लागू देत नाहींत, अशाहि कांहीं तक्रारी आहेत. विमेदारांची संमती नसतांनाच त्यांना विमा पॉलिसी दिल्याचीहि उदाहरणें नजरेस आलीं आहेत. रिबेटच्या पद्धतीस ४१ व्या कलमानें आळा घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी व्यवहारांत तो बसलेला नाहीं.

### महाराष्ट्रीय ॲक्चुअरी

हिंदुस्थानांतील ॲक्चुअरींच्या ताज्या यादींत खालील महाराष्ट्रीय नांवें आढळतात :—

**फेलो**—श्री. जी. एस. दिवाण, के. वाय. जोशी, जी. एस. प्रियोळकर, एम. व्ही. सोहोनी, एस. एन. वैद्य.

**असोसिएटस्**—पी. बी. आगाशे, एस. सी. दामले, जी. एम. गाडगीळ, एन. एन. हर्षे, के. वाय. काळे, एस. एल. मुततकर, जे. टी. रणदिवे, व्ही. एल. सप्रे.


# दि न्यू सिटिझन बँक
## ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : १,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,००० रु. वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ फ्रेंडांक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव) ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.



विमेदारांचे नियंत्रणाखाली चाललेली व त्यांचेच मालकीची आदर्श विमा कंपनी

# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

**आपली सुप्रीम म्यूच्युअलची निवड योग्य आहे.**

—कारण—

★—ती भक्कम पायावर आधारलेली आहे.
★★—विमेदारांचें हित हेंच तिचें ध्येय आहे.
★★★—विम्याचे क्लेम्स देण्यांत ती अत्यंत दक्ष आहे.
★★★★—विमेदारांना सोईच्या व आवडीच्या विमायोजना देण्यांत विशेष लक्ष घालते.

आजच पॉलिसी घेऊन भविष्यकाळाची
तरतूद करणें आपलें हिताचे आहे.

सढळ अटीवर एजन्सीज देणें आहेत. —भेटा अगर लिहा—

त्र्यं. दा. देशपांडे
बी. ए., एलएल. बी.
सेक्रेटरी

व. न. म्हैसूर
एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर

**हेड ऑफिसः—८६६ सदाशिव पेठ, पुणें २.**

**सिमेंटच्या कारखान्याची यंत्रसामुग्री**–संयुक्तप्रांत सरकारनें मिर्झापूर जिल्ह्यांत एक सिमेंटचा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री तयार करण्याचें काम एका ब्रिटिश कंपनीला सांगण्यांत आलें असून ह्या यंत्रसामुग्रीला ८ लाख, ७० हजार पौंड किंमत पडणार आहे.

**फिलमच्या सांठ्याचा धोका**—फिल्म्स साठविलेल्या जागेंत स्फोट होऊन अपघात होतात. ते कमी करण्यासाठी फिल्म्सचा सांठा व ने-आण ह्यासंबंधीं हिंदुस्थान सरकारनें कांहीं नियम केले आहेत. सदर बाबतची नोटीस ३ एप्रिल १९४८ च्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

**पंजाब व संयुक्त प्रांतांतील गव्हाचें उत्पादन**—पंजाब व संयुक्त-प्रांत ह्यांत मिळून हिंदुस्थानांतील गव्हाच्या लागवडीपैकीं ५० टक्के लागवड होते. ब्रिटिश हिंदुस्थानचीच गव्हाची लागवड लक्षांत घेतल्यास हें प्रमाण ६०·५ टक्के पडते. पंजाब व संयुक्त प्रांतांत मिळून हिंदुस्थानांतील तीन पंचमांश गहूं पिकतो. पहिल्या महायुद्धाचा शेवट झाल्यापासून हिंदुस्थानांतून गहूं निर्यात होण्याचे प्रमाण खूपच घटलें आहे.

**पौंडी शिलकेंतील तारतम्य**—हिंदुस्थानच्या खात्यावर युद्ध-कालीं जमा झालेल्या पौंडी शिलकेपासून मामुली व्यापारामुळें जमा झालेली पौंडी शिल्लक वेगळी दाखविण्यांत यावी असें मत एका इंग्लिश अर्थ–विषयक साप्ताहिकानें व्यक्त केलें आहे. हें साप्ताहिक पुढें म्हणते कीं, हिंदुस्थानला आतां स्वातंत्र्य मिळालें असल्यामुळें त्यानें आपली परदेशी हुंडणावळ जपून वापरली पाहिजे; त्याचप्रमाणें ब्रिटनला आपली पुनर्घटना करावयाची आहे, हेंही हिंदुस्थानें लक्षांत ठेवलें पाहिजे.

**पाकिस्तानचें राष्ट्रगीत**—पाकिस्तानसाठी राष्ट्रगीत रचणाऱ्या कवीला बाक्षिस देण्यासाठी म्हणून १० हजार रुपये पाकिस्तानच्या मुख्य मंत्र्यांच्या स्वाधीन करण्यांत आले आहेत.

**भाडेकरूंचे तंटे कोण सोडवणार ?**—भाडेकरू व घरमालक ह्यांच्या भांडणांत पडून निकाल देण्याचा सरकारला अधिकार नसून त्यासाठीं निर्माण केलेल्या रेंट कोर्टांकडूनच त्यांचे निकाल लागावयाचे आहेत, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. पुष्कळ भाडेकरू व मालक आपसांतील भांडणाबद्दल सरकारला लिहितात व कायद्याचा सल्ला विचारतात. परंतु असा सल्ला देणें सरकारच्या कक्षेंत नाहीं.

**श्री. मुल्हेरकर ह्यांची नेमणूक**—फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे सेक्रेटरी श्री. डी. जी. मुल्हेरकर ह्यांची, हिंदुस्थानाचे टोकियो ( जपान ) मधील व्यापारी प्रतिनिधी म्हणून नेमणूक झाली आहे.

**मुंबईंत कापडाच्या विक्रीची सहकारी व्यवस्था**—सुमारें १५० सहकारी कंझूमर्स सोसायट्यांमार्फत कापड विक्रीची व्यवस्था कशी करतां येईल, ह्याबाबत मुंबई शहरांतील सोसायट्यांचे प्रतिनिधी गिरणी मालकांबरोबर वाटाघाटी करीत आहेत.

**सहकारी डेअरी सोसायट्यांच्या नोकरवर्गासाठी वर्ग**—मुंबईंतील सहकारी डेअरी सोसायट्यांच्या नोकरवर्गासाठी मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट पंधरा दिवसांचा एक क्लास चालविणार आहे. त्याचें उद्घाटन १७ मे रोजीं इन्स्टिट्यूटचे ऑ. सेक्रेटरी व मुं. प्रां. स. बँक लि. चे ऑ. मॅ. डायरेक्टर श्री. वर्दे ह्यांचे हस्तें झाले.


## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

**पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.**

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

## निवडक व उत्कृष्ट मासे

★ मोठे पॉपलेट्स ★ सुरमाई ★ घोळ
★ दाढा ★ रावस

स्थानिक व बाहेरगांवच्या विक्रेत्यांना व हॉटेलसाठीं लागणारे घाऊक व किरकोळ मासे योग्य भावांत मिळतील.

**फ्रोझन फूड कंपनी**
(१) मुळा रोड, पुणें ३ (२) स्टॉल नं. ४१ कॅन्टोन्मेंट फिश मार्केट, पुणें १

## एजन्सी घ्या

संस्थेची प्रगति व एजन्सीच्या उदार शर्ती ह्यामुळें लाभदायक ठरलेली "सह्याद्रि"ची एजन्सी घेऊन आपला आर्थिक प्रश्न सोडवा.

**प्रगतीचा आढावा**
आलेलें काम १ कोटी ९५ लक्ष
मंजूर काम २ कोटी ५३ लक्ष
पूर्ण काम १ कोटी ३० लक्ष
सन १९४७ मधील पूर्ण काम
६० लाखांचेवर

**यशस्वी मूल्यमापन**
ई. बोनस } हयातीचे विमे रु. ६
} मुदतीचे विमे रु. ५
याशिवाय सर्व प्रकारचे रिझर्व्हज् राखूनही झालेला निव्वळ फायदा
रु. ५०,०००/–

ह्या संस्थेंतच आपला आयुर्विमा उतरा. सविस्तर माहितीसाठी लिहा.

कचेऱ्याः—दिल्ली, मुंबई, पुणें, बेळगांव, कोल्हापूर, म्हापसें, गोवा, रत्नागिरी, सावंतवाडी, हुबळी, अहमदाबाद, नागपूर, धुळें, इंदोर, हारदा, रायपूर, जबलपूर, अमरावती, कारवार, वगैरे.

गो. ग. सौंदणकर, मॅ. डायरेक्टर, सह्याद्रि विमा कं. लि., नासिक.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान ६ वें, ता ११-१०-४७

## सहकारी चळवळीचें भवितव्य

(प्रो. एस. व्ही. कोगेकर)

"मीं स्वतः सहकारी चळवळीचा एक अभ्यासक आहे; प्रत्यक्ष कार्य करीत नाहीं. त्यामुळें या चळवळीच्या भवितव्याविषयीं कांहीं सर्वसाधारण विचार बँकेचे व्हाइस चेअरमन, रावसाहेब खोले, यांच्या आग्रहावरून मीं आपणांपुढें मांडणार आहें. या चळवळीच्या पहिल्या ४३ वर्षांचा काल संपून एक नवा खंड होत आहे. आपण आज संक्रमणावस्थेंत आहोंत व नव्या कालाला अनुसरून आपली विचारसरणीही बदलत आहे, असें वाटतें.

"आतांपर्यंतच्या सहकाराचा अनुभव निराशाजनक आहे; कारण शेतीच्या धंद्यांत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाहीं. ती कां होऊं शकली नाहीं याचीं कारणें थोडक्यांत अशीं देतां येतील: (१) सहकारी चळवळीची एकतर्फी वाढ होऊन फक्त पतीच्या व्यवहारालाच प्राधान्य दिलें होतें. (२) सहकारी तत्वावर विशेष भर दिल्यामुळें शेतकऱ्यांचें टिकाऊ सहकार्य मिळविणें कठीण झालें. (३) अमर्याद जोखीम आवश्यक केल्यामुळें चळवळीचें क्षेत्र फारच मर्यादित झालें. (४) कार्यकर्त्यांचा अभाव व जनतेचा निरुत्साह पदोपदीं नडल्यामुळें शेतीच्या धंद्यांत आमूलाग्र बदल मुळींच करतां आला नाहीं. थोडें तपशिलांत जाऊन असें म्हणतां येईल कीं, सहकारी संस्थेचे सभासद होण्याची सक्ति मुळींच नसल्यामुळें हा खुषीचा सौदा झाला. त्यांची एकी होण्याला किंवा उत्साह वाढण्याला कांहीं जागाच नव्हती. या उलट, फायद्यासाठीं मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या संस्थांना पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें व खाजगी उद्योगधंद्यांवरील श्रद्धा वाढल्यामुळें सहकाराची प्रगति होऊं शकली नाहीं. बाजारांत अनिर्बंध चढाओढीचा व्यवहार चालू असल्यामुळें सहकारी संस्थांना कांहीं सवलती सरकारनें दिल्या; पण या सवलती कर्जाच्या व्यवहाराबाहेर मुळींच पडूं शकल्या नाहींत. आज सहकाराला अधिक उत्तेजन मिळून त्याच्या प्रसारास नवीन क्षेत्रें उघडलीं जात आहेत हें आनंदानें मान्य केलें पाहिजे. वांटपाचें कार्य सहकारी मंडळांच्या मार्फत आज चालू झालें. तें वाढवून अधिक क्षेत्र मोकळें करून देणें शक्य आहे. लहान लहान उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि सहकाराला पुष्कळच स्थान आहे यांत शंका नाहीं.

"आतां पुढील काळांतील सहकाराच्या कल्पना काय असाव्यात व त्याविषयीं लोकांचे विचार कसे बदलूं लागले आहेत याचें थोडें विवेचन केलें पाहिजे. आपल्या आर्थिक विचारसरणींत झपाट्यानें बदल होत आहे असें मला वाटतें. सरकारकडे पाहण्याचा दृष्टिकोन लोकशाहींत निराळा दिसतो. सर्व समाजाची सोय, देशाची सार्वत्रिक समृद्धि, नियोजित उत्पादन, इत्यादि कल्पना उदयाला येत आहेत. त्यामुळें खाजगी उद्योगधंद्यांच्या मर्यादा ठरवून घेणें जरूर होऊन राष्ट्रीयीकरणावर जोर दिला जात आहे. या मूलभूत गोष्टींचा विचार केल्यास सरकारला सक्तीनें सहकार घडवून आणणें जरूर पडेल असें मला वाटतें. कारण, आतां सरकार आणि जनता यांच्यामधील दुजाभाव कमी होत जाणार. पण जनतेचें हित साधण्यासाठीं देखील ज्या गोष्टी सहकारी चळवळीच्या आवाक्याबाहेर आहेत असें वाटतें त्या ओढूनताणून पूर्वीच्या सहकाराच्या क्षेत्रांत आणण्याचा प्रयत्न करणें अनिष्ट होईल. मोठ्या प्रमाणावर शेती करण्यावांचून शेतीचें उत्पादनाचें कार्य नीट होणार नाहीं. त्यामुळें शेतीच्या धंद्याची नवीन आखणी करावी लागेल. सरकाराला ती कांहीं अशीं सक्तीनें सहकार घडवून आणूनच सिद्ध करतां येईल. जनतेच्या हितासाठीं नियोजित अर्थरचना आणखी पुष्कळ मोठ्या धंद्यांचे बाबतींत अशीच केली पाहिजे. स्वतंत्र अस्तित्व कसें टिकवावें हा प्रश्न आतां रहाणार नाहीं, तर वर्गहिताचा विचार बाजूला सारून सहकारी चळवळ ही समाजाच्या नियोजित सर्वांगीण उन्नतीचा एक भाग—एक घटक—आहे या दृष्टीनें तिकडे पाहिलें पाहिजे. मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण आणि यांत्रिक शेती यांचा अवलंब करावयाचा म्हटल्यास लहान लहान उत्पादक संस्थांना पूर्णतः स्वावलंबी रहातां येणार नाहीं. तथापि श्रमाचा मोबदला सरकारला बरोबर द्यावा लागेल व तोटा आल्यास तो सरकारच भरून देईल. समग्र राज्य ही सहकारी संस्था होऊं पहात आहे. सरकार हें या संस्थेचें मुख आहे. सरकारची ढवळाढवळ नको, ही पूर्वींची कल्पना टाकून देऊन ज्यायोगें सर्व राष्ट्राची संपत्ति वाढेल तिकडेच सर्वांनीं नजर दिली पाहिजे. माझ्या मतें हेंच सहकारी चळवळीचें भवितव्य आहे.

शेवटीं, आजच्या राष्ट्रीय सरकारचें यासंबंधीं धोरण काय आहे त्याविषयीं विचार करणें जरूर आहे. शेतीउत्पादनाच्या बाबतींत सरकारला निर्भेळ सहकार चालू ठेवावयाचा आहे का सरकारला सक्ती करण्याची पद्धत संमत आहे हें समजत नाहीं. प्रो. काजी यांच्या मद्रासच्या भाषणांत जुनी विचारसरणीच चालवावी असा आग्रह आहे. पण ती बदलली पाहिजे असें मला वाटतें. नियोजन पद्धति स्वीकारल्यास सरकारला राष्ट्रीय मालकी प्रस्थापित करणें जरूर पडेल. सहकारी संस्थांची मिळकत राष्ट्रीय मालकीमध्येंच सामावून बसविली पाहिजे. त्यांत मक्तेदारीला जागा नाहीं. पण आजच्या घटकेला सरकारची भांडवलशाहीला पायबंद घालण्याची तयारी आहे असें वाटत नाहीं. तसें पाहिलें तर आज कोठलेंच सुसूत्र धोरण सरकारकडून अवलंबिलें जात नाहीं. त्यामुळें सरकारी दृष्टीनें सहकारी चळवळीचें भवितव्य काय हें सांगणें कठीण आहे. या घोटाळ्यांतून एखादी हुकुमशाही राजवट प्रस्थापित झाल्यास भांडवलशाहीला मदतच होईल. कदाचित् प्रांतिक क्षेत्रांत नियोजन टिकून राहिलें तर तेवढीच सहकाराला प्रगती करण्यास मिळेल व त्यावरच समाधान मानावें लागेल."

### मद्रास प्रांतांतील सहकाराची प्रगति

| | ३०-६-१९४६ | ३०-६-१९४७ |
|---|---|---|
| सोसायट्या | १६,०९८ | १७,०५७ |
| त्यांचे सभासद | १८,८२,००० | २२,१०,००० |

प्रांतिक सहकारी बँकेकडील ठेवी ३३ कोटी रुपयांच्या ४ कोटी, १२ लक्ष रुपयांवर गेल्या आणि तिला ३ लक्ष, १६ हजार रु. नफा झाला. पूर्वींच्या वर्षांच्या मानानें प्रां. बँकेनें तिपटीहतकीं कर्जें दिलीं. मद्रास सहकारी मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकेनें ४८ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं. १९४६-४७ मध्यें तिनें ४३ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं होतीं. कंझूमर्स सोसायट्यांची संख्या १,३४६ ची १,६८८ झाली आणि त्यांची उलाढाल १२ कोटी रुपयांवरून १७ कोटी रुपयांवर गेली. प्रोड्यूसर्स-कंझूमर्स जोड सोसायट्या हें १९४६-४७ चें वैशिष्ट्य होतें; अशा २७५ सोसायट्यांचें वसूल भांडवल १ कोटी, ६६ लक्ष रुपये असून त्यांनीं गेल्या वर्षी १० कोटींची खरेदी व १०३ कोटींची विक्री केली. विणकरांच्या सोसायट्यांची संख्या ३३६ ची ६५९ होऊन त्यांचें उत्पादन २३ कोटी रुपयांवरून ४३ कोटी रुपयांवर गेलें. गृह मंडळ्यांस विशेष उत्तेजन देण्यांत आलें.

## उद्‌बोधक उद्‌गार

### जमीन स्वतः कसा, नाहींतर दुसऱ्यास कसूं द्या

" मोठाल्या शेतजमिनीवर वंशपरंपरा मालकी हक्क सांगण्यांत मनुष्यास अभिमान वाटावा, हें मी जाणतों. परंतु भावनावश होऊन उपयोगी नाहीं; काळाबरोबर आपण चाललें पाहिजे. आपली सर्व जमीन स्वतःच कार्यक्षमतेनें कसली पाहिजे, नाहींतर दुसऱ्यास तरी ती कसूं दिली पाहिजे. स्वतंत्र देशांत, लोकांच्या आर्थिक परिस्थितींत मोठी तफावत असणें हें अशांतता व धोका ह्यांचें मूळ होतें; आणि समाजाच्या सर्व घटकांना समान न्याय मिळावयाचा असेल तर राष्ट्रास आपलें जमीन विषयक धोरण बदलणें क्रमप्राप्त आहे. पूर्वीच्या सरकारास-तें परकीय असतांहि-मनःपूर्वक पाठिंबा देत आला आहांत; विधिमंडळ आखील त्या धोरणासहि तुमचा पाठिंबा मिळेल, ह्याविषयीं मला शंका नाहीं. ":-पुणें येथें भरलेल्या मुंबई प्रांतिक जमीनदार परिषदेचें उद्‌घाटन करतेवेळीं, पंतप्रधान श्री. खेर ह्यांनीं केलेलें भाषण.

### केवळ भातावर अवलंबन नको

दक्षिण चीन, दक्षिण आशिया व हिंदुस्थान येथील लोकांच्या अन्नांत तांदळाचा अंश मोठा असतो, त्यामुळें सकसपणा येऊं शकत नाहीं. मांसल अन्नें, दूध, अंडीं, मासे, इत्यादींच्या सेवनानें अन्नाचा सकसपणा वाढेल. डाळी, घेवडा, भाज्या, फळें, कंद नारळ, इत्यादींचाहि आहारांत समावेश करावा. — डॉ. डब्ल्यू. आर. आर्करॉइड ह्यांचें वॉशिंग्टन येथील भाषण.

### उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण

" कांहीं विशिष्ट ठिकाणीं उद्योगधंदे फार केंद्रित झाले असून त्यामुळें सामाजिक स्वरूपाचे अनेक प्रश्न उत्पन्न झाले आहेत व ते अजून सुटलेले नाहींत. धंदे कोठें काढले जावेत, ह्याबाबत राष्ट्रीय दृष्टीनें एखाद्या मध्यवर्ती संस्थेकडून आजवर कोणत्याहि तऱ्हेचें मार्गदर्शन झालें नाहीं. उद्योगधंदे उभारतांना व्यक्तींचा ज्या गोष्टींकडे कानाडोळा होतो त्याहि, लवकरच नेमली जाणारी योजना समिती ध्यानांत घेईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. धंद्यांचें विकेंद्रीकरण करण्याला आणखीहि एक बलवत्तर कारण आहे; आणि तें म्हणजे इतउत्तर युद्धकालांत बॉंबपासूनचा धोका, हें होय. " :—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या त्रैमासिक सभेंत श्री. द. रा. नाईक, जे. पी., ह्यांचें अध्यक्षीय भाषण.

### भाड्यानें ट्रॅक्टर्स मिळतील


मध्यप्रांत सरकार नागपूर, होशंगाबाद व दर्यापूर (वऱ्हाड) येथें ट्रॅक्टर्स भाड्यानें देण्याची व्यवस्था करणार आहे. ८ इंच खोल नांगरण्यास दर एकरी २० रु. पडतील. किमान १,००० एकर जमीन नांगरण्यासाठीं एकत्र मिळाली पाहिजे. होशंगाबाद येथें तीन ट्रॅक्टर्स आजहि मिळूं शकतात.

### ओरिसामध्यें सहकाराच्या वाढीचे प्रयत्न

ओरिसा प्रांताचें सरकार तेथें सहकारी चळवळीची वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्यासाठीं एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली आहे. तेथें आज प्रांतिक सहकारी बँक नाहीं. सोसायट्यांची एकूण संख्या समाधानकारक असली तरी त्यांचा कारभार नीट नाहीं आणि त्यांचें वसूल भांडवल किंवा सभासद संख्या ही इतर प्रांतांचे मानानें अत्यल्प आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.